# अधिसूचना

विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
दिनांक. २८ ऑगस्ट २०१७.

श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८०.

**क्र.एसव्हीटी.१११६/प्र.क्र.२०३/का.१६.**-श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० (१९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६) याच्या कलम ५ च्या पोट - कलम (३) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र शासन याद्वारे, श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथील श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्त व्यवस्था व्यवस्थापन समितीच्या उक्त पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या सात इतर सदस्यांच्या संख्येत दोनने वाढ करीत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(एन.जे.जमादार )**
**प्रधान सचिव व विधि परामर्शी**

**क्र.एसव्हीटी.१११६/प्र.क्र.२०३/का.१६**
विधि व न्याय विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक. २८ ऑगस्ट २०१७.

व्यवस्थापक, मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सोबतची मराठीतून असलेली अधिसूचना असाधारण राजपत्र भाग-४ ब मध्ये प्रसिध्द करावी व त्याच्या १०० प्रती या विभागाकडे पाठवाव्यात.

**(म.भा.गोसावी)**
**विधि सल्लागार-नि-सह सचिव**

**प्रत :-**

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई

२) मा.राज्यमंत्री (विधि व न्याय) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३) अध्यक्ष, श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

४) सदस्य, श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

५) कार्यकारी अधिकारी, श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

६) निवड नस्ती/कार्यासन १६